पुण्यनगरी



कोल्हापूर : झोनल हॅन्डबॉल स्पर्धेतील न्यू कॉलेजच्या विजेत्या संघासोबत संस्थेचे चेअरमन के. जी. पाटील इत्तर मान्यवर.

# न्यू कॉलेज हॅन्डबॉलमध्ये अजिंक्य

**कोल्हापूर :** न्यू कॉलेजच्या क्रीडांगणावर शिवाजी विद्यापीठ इंटर झोनल हॅन्डबॉल स्पर्धा पार पडल्या. या स्पर्धेचे उद्घाटन संस्थेचे चेअरमन के. जी. पाटील यांच्या हस्ते झाले. यावेळी व्हा. चेअरमन डी. जी. किल्लेदार तसेच क्रीडाशिक्षक हजर होते. न्यू कॉलेजच्या हॅन्डबॉल संघाने शिवाजी विद्यापीठ विभागीय स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकावला. या संघाला क्रीडा विभागप्रमुख प्रा. अमर सासने यांचे मार्गदर्शन लाभले. सलग २१ व्या वर्षी विभागीय स्पर्धेत न्यू कॉलेजने अजिंक्यपद पटकावले आहे. शिवाजी विद्यापीठ क्रीडा विभागाचे संचालक डॉ. शरद बनसोडे, संस्थेचे संचालक शिवछत्रपती पुरस्कारप्राप्त आर. डी. पाटील, उपप्राचार्य डॉ. ए. एम. शेख, निवड समितीचे सदस्य डॉ. श्रीनिवास पाटील, सुनील पाटील, विश्वास सावंत, संदीप पाटील, दत्तात्रय भोपळे उपस्थित होते.

15 DEC 2022
पुण्यनगरी
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# आंतरराष्ट्रीय परिषदेत विद्यापीठ शिक्षकांचा सहभाग

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

हनोई (व्हिएतनाम) येथे आयोजित करण्यात आलेल्या आंतरराष्ट्रीय प्रगत प्रशिक्षण परिषदेमध्ये शिवाजी विद्यापीठाच्या रशियन भाषा शिक्षकांनी सहभाग घेतला आणि विविध देशांतील भाषातज्ज्ञांशी शैक्षणिक व सांस्कृतिक सद्यःस्थितीबाबत वैचारिक आदानप्रदान केले.

'द रशियन फेडरल एजन्सी फॉर ह्युमॅनिटेरियन को-ऑपरेशन' या रशियन संस्थेच्या पुढाकाराने आशियाई देशांमधील विविध विद्यापीठांत रशियन भाषा अध्यापन करणाऱ्या शिक्षकांसाठी एका प्रगत प्रशिक्षण अभ्यासक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

दि. ४ ते ७ डिसेंबर या कालावधीत हनोई (व्हिएतनाम) येथील 'रशियन हाऊस'मध्ये हा आंतरराष्ट्रीय प्रशिक्षण अभ्यासक्रम घेण्यात आला. यात सहभाग घेण्यासाठी हनोई येथील 'सेंटर फॉर द सपोर्ट ऑफ सोशल, कल्चरल अँड एज्युकेशनल प्रोजेक्टस्'च्या वतीने शिवाजी विद्यापीठातील विदेशी भाषा केंद्राच्या रशियन भाषा अध्यापकांना अधिकृतरीत्या आमंत्रित करण्यात आले होते.

विभागाच्या सहयोगी प्राध्यापक डॉ. मेघा पानसरे, सहयोगी अध्यापक शीतल कुलकर्णी, प्रियांका माळकर व अभिषेक जोशी यांनी या प्रशिक्षण अभ्यासक्रमात सहभाग घेतला. या उपक्रमात भारत, श्रीलंका, म्यानमार, लाओस, कंबोडिया, बांगलादेश, थायलंड आणि व्हिएतनाम इत्यादी आशियाई देशांतील रशियन भाषा अध्यापक सहभागी झाले होते.

पुण्यनगरी

# भारती विद्यापीठ ऑफ फार्मसीचे यश

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या डिसेंबरमध्ये घेण्यात आलेल्या आविष्कार स्पर्धा परीक्षेत भारती विद्यापीठ कॉलेज ऑफ फार्मसी महाविद्यालयाने उत्तुंग यश संपादन करत गुणवत्ता यादीत तीन क्रमांक पटकावून महाविद्यालयाची उज्ज्वल यशाची परंपरा या वर्षी कायम राखली. यशस्वी विद्यार्थ्यांचे मानद संचालक डॉ. एच. एम. कदम, प्राचार्य डॉ. एच. एन. मोरे यांनी अभिनंदन केले. स्वप्नील थोरात याने (पीपीजी कॅटेगरी) व संकेत राठोड, तृतीय (पीजी कॅटेगरी) क्रमांक पटकावला आहे. याला डॉ. पी. व्ही. चौधरी मार्गदर्शक होते. रविना सुतार (पीजी कॅटेगरी) हिने उत्कृष्ट प्रेझेंटेशनमध्ये यश मिळवले. तिला डॉ. डी. टी. गायकवाड, प्रा. व्ही. एच. थोरात यांचे मार्गदर्शन लाभले.